# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**सायंकाळ**

---

**दिनांक १४.०८.२०२२ रविवार**

**गुन्हे**

**१) पो.स्टे.कपिलनगर – जबरी संभोग**

डिसंबेर २०२१ ते २३.०६.०२०२२ चे दरम्याण पो.स्टे. कपिलनगर हद्दीत राहणाऱ्या २५ वर्षीय फिर्यादी व आरोपी आशिष गोपीचंद बागडे, वय २६ वर्ष रा. वायगाव, ता. रामटेक, जि. नागपुर याची फेसबुकवर ओळख होवुन, प्रेमसंबध झाले. आरोपीने फिर्यादीचे घरी येवुन लग्नासाठी रितसर मागणी केली व त्याचे साक्षगंध झाले. आरोपीने फिर्यादीस बायको असल्याचा विश्वास देवुन, तिचे इच्छेविरूध्द जबरदस्तीने शारीरीक संबध केले. आरोपीने फिर्यादीस लग्नाचे आमिष दाखवुन, फिर्यादी सोबत वारंवार जंबरी संभोग केला. फिर्यादीने लग्नासाठी म्हटले असता आरोपीने नकार दिला. फिर्यादीने पोलीसात तक्रार देण्यास जाते म्हटले असता आरोपीने फिर्यादीचे फोटो एडीट करून व्हायरल करण्याची धमकी दिली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. कपिलनगर येथे म.पोनि वाघधरे, ७७२२०८९८५८ यांनी आरोपी विरूध्द कलम ३७६(२)(एन),५०६ भादवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पो.स्टे. बेलतरोडी :–**

दिनांक १३.०८.२०२२ चे २०:०० वा. ते २०:५० वा चे दरम्यान रियाज अयुब तडवी वय २७ वर्ष रा. भुसावळ, खडका रोड, जळगाव हे नागपुरला बुध्दीबळ स्पर्धे करीता आले होते. ते पो.स्टे. बेलतरोडी हद्दीत पायोनिअर आपर्टमेन्ट, ऐ विंग, फ्लॅट नं ७०६ येथे राहणारे त्याचे मित्र नामे मोहमद मिराज कामील याचे कडे थाबंले होते. घटना वेळी अज्ञात कारणावरून सातव्या माळ्याचे बालकनीतुन उडी मारल्याने, खाली पडुन जख्मी झाले. त्यांना उपचारा करीता ऐम्स हॉस्पीटल व तेथुन मेडीकल ट्रामा सेंटर येथे दाखल केले.उपचारा दरम्यान डॉक्टरांनी १४.०८.२०२२ चे ०१.४५ वा. मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. नंदनवन येथे म.सपोउपनि यादव, ९९७०९८२०४५ यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

**(इतर)**

**नागपुर शहर पोलीस आयुक्तालया तर्फे आयोजीत "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" सोहळ्याचा चतुर्थ दिन संपन्न :–**

आज दिनांक १४.०८.२०२२ रोजी सकाळी ०७:०० वा पोलीस भवन सिव्हील लाईन, नागपुर येथे मा. पोलीस आयुक्त नागपुर शहर, श्री अमितेश कुमार यानी **"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव"** सोहळ्या निमीत्त आयोजीत १० कि.मी. नागपुर पोलीस मॅरेथॉनला मान्यवरांच्या उपस्थितीत हिरवी झेंडी दाखवुन सुरवात केली.

रिमझीम पावसात, अति उत्साहात स्पर्धकांनी वेळेवर हजरी लावली. मॅरेथॉन मध्ये २५०० स्पर्धकांनी अधिकृत नोदंणी केली होती. वेळेवर नोंदणीकृत सदस्यांव्यतीरिक्त आम नांगरीकांनी हजेरी लावली. पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सुध्दा उत्साहात मॅरेथॉन मध्ये भाग घेतला. पोलीस भवन येथुन सुरवात होवुन जपानी गार्डन, टीवी टॉवर, वायुसेना नगर, फुटाळा तलाव, तेलंगखडी मंदिर, सीपी क्लब, वॉकर्स रोड, पोलीस जिमखाना येथुन परत पोलीस भवन येथे मॅरेथॉन समाप्ती झाली. मॅरेथॉनच्या मार्गात ठिकठिकाणी नागरीकांनी भरभरून प्रतीसाद देवुन स्वागत केले. मॅरेथॉन मध्ये भाग घेणारे प्रत्येक नोंदणीकृत सदस्याना टि शर्ट, मेडल, प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच वयोगट १८ ते ३०, वयोगट ३० ते ४०, वयोगट ४० ते ५० महिला व पुरूष गटातील प्रथम, व्दितीय, तृतीय आलेल्या स्पर्धकांना पारितोषकपर चषक प्रदान करण्यात आले. तसेच याप्रसंगी व्दितीय दिनी घेण्यात आलेल्या चित्रकला सपर्धेचे विजेत्यानां बक्षिस प्रदान करण्यात आले. ज्यामध्ये प्रथम क्रमाक विजेती कु. अमिशा धिरज बांगरे, हिला ५०००/—रू रोख व प्रमाणपत्र, व्दितीय क्रमाक विजेता शिवम नरेंद्र बारापात्रे याला ३०००/— रू रोख व प्रमाणपत्र, तृतिय क्रमाक विजेजा आर्यन मनिष बिसने याला २०००/—रू रोख व प्रमाणपत्र देण्यात आले. शिवांशु खोडे, प्रथमेश गायधनी, अनिशा बागरे, अनुक्षा दातीर व साक्षी भीमटे यांना उत्तेजनार्थ बक्षिसे/प्रमाणपत्रे देण्यात आले.

मुद्देमाल निर्गती कार्यक्रम अंतर्गत मा. पोलीस आयुक्त, श्री अमितेश कुमार यांचे हस्ते पोलीस भवन येथे नागपुर शहरातील विविध पोलीस स्टेशन अंर्तगत विविध गुन्ह्यातील पोलीसांनी आरोपींकडून जप्त केलेला मौल्यवान मुद्देमाल त्यांचे मुळ मालकांना/ फिर्यादीना परत करण्यात आला. नमुद कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे यांनी केले. नागपुर शहराचे पाच परिमंडळ अंतर्गत एकुन १२७ फिर्यादीना त्यांचा मौल्यवान मुद्देताल एकुण किंमती १,३८,९३,७१९/—रू चा सन्मानपुर्वक परत देण्यात आला. ज्यामध्ये प्रामुख्याने १) पो.स्टे.मानकापुर येथील फिर्यादी मो. फैजान अशफाक उद्दीन यांना २०,४९,०००/—रू चे सोन्याचे दागिने २) पो.स्टे. यशोधरानगर येथील फिर्यादी मोहन थावरदास सहजनाणी याना रोख रक्कम १९,९९,०००/—रू ३) पो.स्टे. लकडगंज येथील फिर्यादी सागर विजय कृष्णानी याना रोख रक्कम १५,००,०००/—रू ४) पो.स्टे. बेलतरोडी येथील फिर्यादी रजत नंदकिशोर विश्वकर्मा याची नेक्सा कंपनीची कार व कॅनन कॅमेरा एकुण किंमती १०,५०,५००/—रू मुद्देमाल ५) पो.स्टे. लकडगंज येथील फिर्यादी श्रीमती तारा लोहीया याना रोख रक्कम ५,६७,०००/—रू तसेच सायबरसेल गुन्हे शाखा यांचे कडुन तांत्रीक विश्लेषन करून जप्त करण्यात आलेले मोबाईल हॅण्डसेट सुपुर्द करण्यात आले. याप्रसंगी नागरीकांनी पोलीसांचे कौतुक करून आभार व्यक्त केले. चोरी गेलेले धन परत मिळाल्याचे समाधान फिर्यादीचे चेहऱ्यावर दिसुन येत होते. पोलीस विभागाने न्याय मिळवून दिल्याचे फिर्यादीनी आपले मनोगतात व्यक्त केले.

मा. पोलीस आयुक्त नागपुर शहर श्री अमितेश कुमार यांचे अध्यक्षतेखाली गणेशोत्सव २०२२ निमित्त गंणेश मंडळाचे पदाधिकारी यांचे आयोजीत बैठकी मध्ये एकुण ३०० चे जवळपास पदधिकारी/सदस्य उपस्थीत होते. मा. पोलीस आयुक्त यांनी आपले अध्यक्षिय भाषनात सर्वाना शासनाच्या नियामांचे पालन आवश्यक असल्याचे व प्रत्येक मंडळाने स्वयंसेवक नेमुन/सीसीटीव्ही कॅमेरे बसवुन काळजी घेणे आवश्यक आहे असे सांगितले. गणेशोत्सव दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची सर्वानी दक्षता घ्यावी व जातीय सलोखा कायम राखण्याचे सर्वाना आव्हान केले.

मा. पोलीस आयुक्त यांनी पदाधिकारी यांच्या अडचणी विचारून त्यावर त्यांना मार्गदर्शन करून उपाय योजना सुचविल्या व निराकरण केले.नागपुर शहर पोलीस आयुक्तालया तर्फे आयोजीत “स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव” सोहळ्याचे अंतर्गत ट्रिलीयम मॉलमध्ये मेडीकल चौक, येथे वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे उपस्थीतीत पोलीस विभागाचे पाईप बॅन्डव्दारे कर्णमधुर संगिताचे सादरीकरण करण्यात आले. उपस्थीत नागरीकांनी बॅन्डचे संगिताचा व सादर संगितधुनीचा आस्वाद घेतला व पोलीस विभागाच्या उपक्रमाचे कौतुक केले.

विद्युत रोशनाईत १९:३० वा रोशनाई व पोलीस बॅन्डचे सुमधूर तसेच देशभक्तीपर संगीत व गाण्यांचे सादरीकरण करण्यात आले. नागरिकांनी पोलीस भवन तसेच संपुर्ण परिसरात, तिरंगी रोशनाईचे झगमगटात हजर राहुन शानदार लेझर शो व सुमधुर बॅन्डच्या तालात, देशभक्तीपर गितांचा आस्वाद घेतला. तसेच मा. पोलीस आयुक्त नागपुर शहर श्री अमितेश कुमार यांचे उपस्थीतीत ट्रिलीयम मॉलमध्ये मेडीकल चौक, इमामवाडा येथे पोलीसांचे पाईप बॅन्डचे सादरीकरण करण्यात आले.

दिवस भर पोलीस भवन परीसरातील आयोजीत पोलीस प्रदर्शनात पोलीस विभागातील राबविण्यात येणारे उपक्रम, कार्यशैली, प्रात्यक्षीके तसेच वेगवेगळ्या विंगचे स्टॉल्सचे प्रदर्शन होते. ज्या मध्ये पोलीस दिदी, पोलीस काका, दामिनी पथक, भरोसा सेल, जलद प्रतिसाद पथक, पोलीसांचे गणवेश प्रदर्शन, सायबर सेल व माहीती तंत्रज्ञान कार्यप्रणाली, डायल ११२ कार्यप्रणाली, सी.ओ.सी. कार्यप्रणाली, वाहतुक शाखेचे कामकाज, अग्निशस्त्रा बाबत, माहीती व प्रदर्शन, अश्रूधुर साहीत्य व माहीती, श्वान पथकाचे तसेच बॉम्बशोधक व नाशक पथकाची कार्यप्रणाली इत्यादी स्टॉलवर बहुसंख्येने नागरिक व विद्यार्थ्यानी उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात सर्व स्टॉल्सना भेटी देवुन, माहीती घेतली व पोलीसाच्या उपक्रमाबाबत समाधान व्यक्त करून प्रशंसा केली.













10 KM
NAGPUR POLICE
MARATHO
RUNNING EVENT ON THE
AUGUST 202






पोलीस आयुक्तालय नागपूर शहर
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
पोलीस प्रदर्शन


पोलीस प्रदर्शन


पोलीस आयुक्तालय नागपूर शहर
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
पोलीस प्रदर्शन
11 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट 2022










(राहुल डोंगरे)
सहा. पोलीस निरीक्षक
पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर.